
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 MAY 2025
पुढारी

# अंधही अभ्यासणार राजर्षी शाहूंचे चरित्र

- ब्रेल लिपीतील पुस्तिकेची निर्मिती
- न्यू कॉलेज व देशमुख हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम
- अंध शाळांना मोफत पुस्तिकांचे वितरण




## राजर्षी शाहू स्मृतिदिनी होणार लोकार्पण

या पुस्तिकेचे लोकार्पण राजर्षी शाहू महाराज स्मृतिदिनी होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागाच्या सहकार्याने मंगळवार, दि. ६ मे रोजी दुपारी साडेचार वाजता, व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात खा. शाहू महाराज यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे , इतिहास विभाग प्रमुख अवनिश पाटील, पुराभिलेखाधिकारी गणेशकुमार खोडके यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

**कोल्हापूर : सागर यादव**

अंध व्यक्तींच्या डोळ्याचे काम ब्रेल लिपी करते. अशा या ब्रेल लिपीतून लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रजाहितदक्ष राजवटीची माहिती मिळणार आहे. ब्रेल लिपीतील राजर्षी शाहू माहिती पुस्तिकेची निर्मिती कोल्हापुरात करण्यात आली आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनपटावर आधारित ब्रेल लिपीमध्ये छपाई करण्यात आलेली ही पहिलीच पुस्तिका आहे.

लुई ब्रेलने विकसित केलेली स्पर्शिक लेखन प्रणाली म्हणजेच ब्रेल लिपी. दृष्टिहीन व्यक्तींमध्ये संवाद, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी ही लिपी शक्तिशाली साधन आहे. या साधनाचा वापर करून लोकराजा राजर्षी शाहू कार्याची माहिती अंध व्यक्तींना मिळावी, या उद्देशाने न्यू कॉलेज (इ. १२ वी, सन २००६) आणि व. ज. देशमुख हायस्कूल (इ. १० वी , सन २००४) बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी या पुस्तिकेची निर्मिती केली आहे. ही संकल्पना राजर्षी शाहू विचार अभ्यासक विक्रम रेपे यांची असून, ब्रेल लिप्यंतर व मुद्रण रायगड येथील स्वागत थोरात यांनी केले आहे. मजकूर निवड व पडताळणीसाठी पुराभिलेख अधिकारी गणेशकुमार खोडके यांचे सहकार्य लाभले आहे. माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक भान राखत मदत स्वरूपात जमा केलेल्या रकमेतून पुस्तिकेचे मुद्रण केले आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या अंध संस्था व शाळा, महाविद्यालयांत पुस्तिकेचे मोफत वितरण करण्यात येणार आहे.

सकाळ



कोल्हापूर : प्रशासकीय अधिकारी मार्गदर्शिका पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी मान्यवर.

# प्रशासकीय अधिकारी मार्गदर्शिका उपयुक्त

## कुलगुरू डॉ. शिर्के : विद्यापीठात प्रकाशन

कोल्हापूर, ता. ४ : महाविद्यालय व विद्यापीठातील प्रशासकीय कामकाज करताना यूजीसी, शासन यांचे जी. आर., परिपत्रक व नियम यांची सतत गरज असते व ते तत्काळ उपलब्ध होणे हे प्रशासन सुरळीतपणे चालण्यासाठी आवश्यक आहे. प्रशासनाची ही गरज पी. डी. चौगले लिखित 'विद्यापीठ व महाविद्यालयीन प्रशासकीय अधिकारी मार्गदर्शिका' या पुस्तकाच्या माध्यमातून निश्चितपणे पूर्ण होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पी. डी. चौगुले लिखित प्रशासकीय अधिकारी मार्गदर्शिका या पुस्तक प्रकाशनावेळी ते बोलत होते. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी या मार्गदर्शक पुस्तिकेमुळे प्रशासनाला मदत होईल, अशा भावना व्यक्त केल्या. मॅनेजमेंट कौन्सिलचे मेंबर न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे उपाध्यक्ष डी. जी. किल्लेदार, उपप्राचार्य डॉ. आर. डी. धमकले, ग्रंथपाल डॉ. आर. पी. आडाव, डॉ. एन. व्ही. पवार, संघटनेचे सचिव अनिल घाटगे, एस. आर. कुंभार, चेतन पाटोळे, एस. पी. माने, सागर बस्ताडे, धनंजय पाटील, मोहन पाटील, विजय शितोळे आणि सुरेश उपलाने उपस्थित होते. प्रास्ताविक कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्ष अनिल घाटगे यांनी केले. प्रशासकीय सेवक एस. आर. कुंभार यांनी आभार मानले.

05 MAY 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैचारिक प्रदूषणाच्या काळात 'शरण साहित्या'ची गरज



कोल्हापूर : शरण साहित्य अभ्यासनाच्या नूतनीकरण कार्यालयाचे लोकार्पण करताना आमदार सतेज पाटील, आमदार जयंत आसगावकर. सोबत सुर्यकांत पाटील बुध्दीहाळकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. रघुनाथ ढमकले आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा बसवेश्वर यांनी बाराव्या शतकात जातीभेदाच्या भिंती मोडून सर्वांना बरोबर घेवून जाण्याची भूमिका घेतली. त्यांनी आपल्या वचनातून मानवतेचा संदेश दिला. परंतू एकसाव्या शतकातही समानता दिसत नाही. तसेच सध्याच्या वैचारिक प्रदुषणाच्या काळात शरण साहित्य आचरणाची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार सतेज पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अभ्यासन कार्यालयाचे नूतनीकरण लोकार्पण आणि पाच लाख रूपयांच्या पुस्तक हस्तांतरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

- आमदार सतेज पाटील यांचे प्रतिपादन

आमदार सतेज पाटील यांच्या फंडातून पाच लाख रूपयांची साडेतीन हजार पुस्तके शरण साहित्य अभ्यासनाला भेट देण्यात आली. तर आमदार जयंत आसगावकर यांच्या फंडातून शरण साहित्य अभ्यासन कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात आले.

आमदार पाटील म्हणाले, युवकांना सर्वच महापुरूषांची खरी आत्मचरित्र, देशाचा खरा इतिहास ऑनलाईन उपलब्ध करून दिला पाहिजे. आमदार जयंत आसगावकर म्हणाले, तरूणाईने बसवेश्वरांच्या साहित्याचा अभ्यास करून संशोधन केले पाहिजे. सुर्यकांत पाटील बुध्दीहाळकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने ३० गुंठे जागा अध्यासनाला दिली असून राज्य शासनाने ३ कोटीचा निधी दिला आहे. भविष्यातही लोकवर्गणीतुन शरण साहित्य अध्यासनाची निर्मिती होईल. अध्यक्षस्थानावरुन कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आमदार सतेज पाटील आणि आमदार जयंत आसगावकर यांनी मानसिक आणि आर्थिक मदत केली आहे.

प्रास्ताविक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले. सूत्रसंचालन यश आंबोळी यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सरलाताई पाटील, टी. एस. पाटील, डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव संजय जाधव, विनोद पंडीत उपस्थित होते.

सकाळ

# डॉ. संजय चव्हाण यांच्या संशोधनाला जर्मन पेटंट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. संजय चव्हाण यांनी संशोधक विद्यार्थ्यांसह माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला बळ देणाऱ्या रासायनिक संयुगाच्या अनुषंगाने केलेल्या महत्त्वपूर्ण संशोधनाला नुकतेच जर्मन पेटंट मिळाले. 'सिस्टीम फॉर प्रिपेरिंग बायन्युक्लिअर कॉपर कॉम्प्लेक्सेस विथ कार्बन रिच अल्किनील फंक्शनलाईज्ड सॅलिसिलिडीमाईन' या विषयावर विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. चव्हाण आणि त्यांचे विद्यार्थी अजित देशमुख, नमिता नाईकनवरे, कुमार चौधरी यांनी संशोधन केले. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील डाटा ट्रान्स्फर, इमेज प्रोसेसिंग, लेझर तंत्रज्ञान इत्यादी बाबींसाठी हे संशोधन अत्यंत उपयुक्त आहे. यासाठी डॉ. चव्हाण यांना भारत सरकारच्या 'डीएसटी-सर्ब'कडून संशोधन प्रकल्प प्राप्त झाला होता. त्यासाठी ३० लाख रुपयांचे अनुदानही मंजूर झाले.

05 MAY 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ महिला संघाने घडवला 'सुवर्ण' इतिहास

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत पटकावले सुवर्ण पदक : अंतिम फेरीत पंजाबमधील लव्हली युनिव्हर्सिटीला जिंकले

प्रतिनिधी
कोल्हापूर

[illegible]

[illegible]



कोल्हापूर : [illegible]

पुढारी

# आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठला सुवर्णपदक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) संघाने अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक पटकाविले. विद्यापीठ महिला सॉफ्टबॉल खेळाच्या इतिहासात पहिल्यांदाच सुवर्णपदक मिळवत इतिहास घडविला आहे.

विक्रम सिम्हापुरी विद्यापीठ, नेल्लूर (आंध्र प्रदेश) येथे झालेल्या अ. भा. आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर (महिला) संघाने अंतिम सामन्यामध्ये लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पंजाबला हरवून अजिंक्यपद मिळवले. या संघाने सलग दहा सामने जिंकून विजेतेपद पटकावले.

संघामध्ये शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या सॉफ्टबॉल खेळाडू स्वप्नाली वायदंडे व ऐश्वर्या पुरी या नामवंत खेळाडूंसह करिश्मा कुडचे, अंजली पवार, मृणाली जाधव, साक्षी येताळे, वैष्णवी हुळहुळे, सृष्टी शिंदे, सलोनी नलवडे, सृष्टी कदम, श्रावणी चौगुले यांनी मोलाची साथ दिली. संघ प्रशिक्षक म्हणून प्रा. विनायक जाधव, संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. राम पवार यांनी काम पाहिले. संघास कुलगुरू प्रा डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एम. शिंदे, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विजेत्या सॉफ्टबॉल महिला संघास आंतर-विद्यापीठ स्पर्धेतील सुवर्णपदक व चषक प्रदान करताना मान्यवर. समवेत खेळाडू.**

05 MAY 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




आंध्र प्रदेश : नेल्लूर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलेल्या शिवाजी विद्यापीठ सॉफ्टबॉल महिला संघास गौरविताना मान्यवर.

# विद्यापीठ महिला संघाला सुवर्णपदक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ सॉफ्टबॉल (महिला) संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धा विक्रम सिम्हापुरी विद्यापीठ, नेल्लूर (आंध्र प्रदेश) येथे सुरू होत्या. अंतिम सामन्यात शिवाजी विद्यापीठ महिला संघाने लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पंजाब विरुद्ध अत्यंत चुरशीने खेळ करत २-१ होमरन्सच्या फरकाने विजय मिळवला.

विद्यापीठाच्या महिला

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धा

सॉफ्टबॉल संघाने सलग १० सामने जिंकून हे विजेतेपद पटकावले. या संघास सॉफ्टबॉल खेळामध्ये पहिल्यांदाच सुवर्णपदक मिळाले. संघ प्रशिक्षक म्हणून प्रा. विनायक जाधव, संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. राम पवार यांनी काम पाहिले. विजयीमध्ये संघामध्ये स्वप्नाली वायदंडे (कर्णधार), ऐश्वर्या पुरी, करिष्मा कुडचे, अंजली पवार, साक्षी येताळे, मृणाली जाधव, वैष्णवी हुळहुळे, सृष्टी शिंदे, सौशज्ञ माने, सागरिका म्हातो, सलोनी नलवडे, सृष्टी कदम, अनुजा पाटील, श्रावणी चौगुले, निलोफर गोस, सृष्टी देशमुख यांचा समावेश आहे. या संघास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

05 MAY 2025 सकाळ



कोल्हापूर : आंध्रप्रदेशातील विक्रम सिम्हापुरी विद्यापीठात झालेल्या आंतरविद्यापीठीय सॉफ्टबॉल स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठाचा महिला संघास मान्यवरांच्या हस्ते चषकासह सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

# 'राष्ट्रीय सॉफ्टबॉल'मध्ये विद्यापीठास सुवर्ण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : आंध्रप्रदेशातील नेल्लूर येथील विक्रम सिम्हापुरी विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ महिला संघाने पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचा पराभव करीत विजेतेपदाला गवसणी घालत प्रथमच सुवर्णमयी कामगिरी केली.

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने सलग दहा सामने जिंकले. अंतिम सामन्यात लव्हली प्रोफेशनल विद्यापीठासोबत झालेल्या अंतिम सामन्यात दोन विरुद्ध एक अशा फरकाने जिंकत अजिंक्यपद पटकाविले. शिवाजी विद्यापीठाच्या सॉफ्टबॉल खेळाच्या इतिहासात प्रथमच सुवर्णपदक मिळवले.

विजयी संघात स्वप्नाली वायदंडे, ऐश्वर्या पुरी, करिश्मा कुडचे, अंजली पवार, मृणाली जाधव, साक्षी येताळे, वैष्णवी हुल्हुळे, सृष्टी शिंदे, सलोनी नलवडे, सृष्टी कदम, श्रावणी चौगुले यांनी नियोजनबद्ध खेळ करीत विजयात मोलाचा वाटा उचलला. यासह सौराज्ञ माने, सागरिका म्हातो, अनुजा पाटील, निलोफर सय्यद गौस, सृष्टी देशमुख यांनीही उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या संघास प्रशिक्षक प्रा. विनायक जाधव, व्यवस्थापक डॉ. राम पवार यांचे मार्गदर्शन लाभले. संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा अधिविभाग प्रमुख व संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.

सकाळ



कोल्हापूर : आंध्र प्रदेश नेल्लूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी जाहीर झालेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# ‘सॉफ्टबॉलसाठी विद्यापीठ संघ जाहीर

कोल्हापूर, ता. ४ : आंध्र प्रदेश नेल्लूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरुष गटाचा संघ जाहीर झाला. सोमवारी (ता. ५) स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर दहा दिवस एकत्र सराव शिबिर आयोजित केले. संघात १६ खेळाडूंचा समावेश केला असून आकाश कदम, (कर्णधार) विक्रांत माने, हृषीकेश संपकाळ, आदित्यराज पाटील, रोहन बाबर, वैभव गाडे, अनिकेत गुजले, रोहन डोंगळे, ऋतिक पाटील, अतितोप मिश्रा, सुशांत वाघमारे, प्रथमेश गोरे, प्रज्वल पाटील, योगेश कुराडे, ऋतुराज पाटील, पृथ्वी अर्जुन तसेच प्रशिक्षक सुहास वाघ, संघ व्यवस्थापक प्रा. सचिन पाटील यांची निवड झाली. संघाला कुलगुरू प्रा डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलगुरू प्रा,. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.